# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**घन कचरा व्यवस्थापन**

सहा.अभि./घकव्य/4241/एल दिनांक -11.08.2022

विषय: - घन कचरा व्यवस्थापन 'एल' विभागामध्ये 'स्वच्छ प्रबोधन अभियान' (वस्ती स्वच्छता योजना)अंतर्गत स्वयंसेवक पुरविण्यासाठी

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

<u>जाहिरात</u>

'एल' विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरीता विविध योजना राबविण्यासाठी 'एल' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात इच्छुक स्थानिक नोंदणीकृत असणा-या अशासकीय संस्था व महिला बचत गट इ. संस्थेमार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरीता तसेच स्वयंसेवकातर्फे योजना राबविण्याकरीता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था | अर्जाचे शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| **1** | **स्वच्छ प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना)** | **74** | **रु.800/- अधिक 18 टक्के जी.एस.टी. एकूण रु.944/-** |

अर्जाचा नमुना 'एल' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. '**बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त**' (Municipal Corporation of Greater Mumbai) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि. 18.08.2022 ते दि. 05.09.2022 सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक 'एल' विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील. सदर कामासाठी अर्ज व रक्कम भरणे आवश्यक आहे. सदर योजने अंतर्गत या विभागात प्राप्त होणा-या अर्जापैकी पात्र होणा-या संस्थांचे अर्ज एक वर्षासाठी ग्राह्य/वैद्य धरण्यात येईल.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी 'एल' विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने 'एल' विभाग कार्यालयात भरलेले अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 06.09.2022 दुपारी 01.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**Sd/-**

**सहाय्यक अभियंता (घकव्य)**

**'एल' विभाग**

Dest/RSY & ML/RSY &ML2018/Comg.